प्रधानमंत्री शक्ती निर्माण शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, कोल्हापूर
कंत्राटी पदभरती जाहिरात दि.

अर्ज कालावधी दि. १८/०७/२०२२ ते २२/०७/२०२२

**शिक्षण विभाग ( प्राथ ) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण कोल्हापूर अंतर्गत डाटा एंट्री ऑपरेटर करीता खालील प्रमाणे कंत्राटी पदे भरावयाची आहेत.**

1. **आरक्षण - 5 पदाबाबत**

| अ क्र | प्रवर्गाचे नाव | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|
| 1 | अनुसुचित जाती | 0 |
| 2 | अनुसुचित जमाती | 1 |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 0 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 0 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 1 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 0 |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | 0 |
| 9 | खुला | 3 |
| | **एकूण** | 5 |

2. **परिक्षेचा दिनांक** :- 30 /08 / 2022
3. **पदसंख्या** :- 5
4. **वेतनश्रेणी** :- प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांचे मानधन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 2022/ प्र.क्र. 40/ एस डी. 3 दिनांक 01 जून 2022 नुसार डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांचे मानधन- रक्कम रु. 20650
5. नागरिकत्व -भारतीय
6. **पात्रता**:- 1) 12 वी किमान 50 % गुण, 2 ) टायपिंग इंग्रजी 40 प्रति मिनिट व मराठी 30 प्रति मिनिट 3) एम. एस. सी. आय. टी. 4) 1 वर्ष अनुभव आवश्यक आहे.
7. **वयोमर्यादा** - जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी किमान 18 कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्ष व मागासवर्ग प्रवर्गासाठी 43 वर्ष वय 30.04.2022 रोजीचे असावे.

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | |
|---|---|---|---|
| | किमान वयोमर्यादा | कमाल | |
| | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ.दु.घ. |
| दि. 30/04/2022 | 18 | 38 | 43 |

Scanned with CamScanner

8. **शैक्षणिक अर्हता:-**

केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार महाराष्ट्र शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ2019/प्र.क्र.74/ एस डी -3 दि. 29 आक्टोंबर 2020

डाटा एन्ट्री ऑपरेटर्स पदासाठी अर्ज करण्यसा-या उमेदवारास इ.10 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इ.12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी याची सरासरी काढण्यात येईल. तसेच एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला 10 गुण बोनस देण्यात येतील. उदा. क्ष उमेदवारास इ. 10 वी मध्ये 70 ठक्के गुण व 12 वी मध्ये 62 टक्के गुण असल्यास याची सरासरी 66 टक्के इतकी होते. सदर उमेदवार पदवीधर असल्यास त्यास 10 बोनस गुण देऊन 76 टक्के होईल.

उमेदवाराची 1:12 प्रमाणे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीमधील उमेदवारांची संगणक परिक्षेकरीता एका पदासाठी गुणांनुक्रमे 12 उमेदवार याप्रमाणे बोलविणेत येईल. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग 30 WPM व इंग्रजी टायपिंग 40 WPM आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परिक्षा 30 मार्कची Excal मध्ये घेण्यात येईल. यामध्ये अशुध्द लेखनाचे गुण प्रतिशब्दानुसार एक गुण वजा केले जातील. यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. उमेदवारांना कंत्राटी पदाएवढी निवड यादी प्रसिध्द केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पूरत्या स्वरुपात डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल.

अनु क्र अ. मध्ये विषद केल्याप्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परिक्षेकरीता एका पदासाठी गुणानुक्रमे 12 उमेदवार याप्रमाणे बोलावण्यात येईल. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग 30 शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टायपिंग -40 शब्द प्रति मिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून 100 गुण देणेत येतील. प्रस्तूत प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त होणारे उमेदवार डाटा एंन्टी ऑपरेटर निवडीसाठी पात्र आहे.

उमेदवारास संगणक परिक्षेमध्ये मिळालेले गुण 100 पैकी व अनु क्र अ प्रमाणे शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन एकूण गुण देण्यात येतील व यानुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याप्रमाणे तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणेत येईल.

9. **अर्ज करण्याची पध्दत:-**

ऑनलाईन पध्दतीने संपूर्ण भरलेला ( ऑफलाईन पध्दतीने ) शिक्षणाधिकारी प्राथ जि प कोल्हापूर या ठिकाणी समक्ष स्वीकारला जाईल.

10. **अर्ज सादर करावयाचा कालावधी** :- 22 / 07/ 2022

11. **शुल्क:-** सर्व मागास प्रवर्ग 200/-, खुला प्रवर्ग- 400/-

12. **परिक्षा शुल्क भरणा पध्दत:-**

Scanned with CamScanner

1. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. 400- व मागासवर्गीय प्रवर्गाकरीता रु 200/- चा डिमांड ड्राप्ट DD जोडणे आवश्यक / अनिवार्य आहे.व डिमांड ड्राप्टच्या मागे स्वत:चे नाव पत्ता स्वहस्ताक्षरात लिहावा.
2. सदरचा डिमांड ड्राप्ट DD "शिक्षणाधिकारी प्राथ शिक्षण विभाग कोल्हापूर " या नावाने देय असलेला असावा. डी डी काढणेसाठी बँकेत पैसे भरलेली स्लिप ग्राहय धरली जाणार नाही
3. परिपूर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची असून अपूर्ण अर्ज अपात्र करणेत येईल.
4. अर्जाची छाननी, परिक्षा/ निवड यादी पसिध्द करणे, हरकती /आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्यानिकाली काढणे आदी रीतसर शासनाच्या तसेच शालेय पोषण आहार कडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडून निवड झालेलया उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेत येईल. याबाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर **www.zpkolhapur.gov.in** प्रसिध्द करणेत येईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाणार नाही. याकरीता प्रधानमंत्री शक्ती निर्माण विभाग, कोल्हापूर कार्यालय कोल्हापूर 0231-2650781 या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधु शकता.
5. अर्जासोबत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

13. **निवड प्रक्रिया**:- जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखत शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

14. **परीक्षेचे टप्पे** :-

प्रस्तूत परीक्षा खालील तीन टप्यात घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| 1.मराठी टायपिंग 30 शब्द प्रति मिनिट | गुण - 30 |
| 2.इंग्रजी टायपिंग 40 शब्द प्रति मिनिट | गुण - 40 |
| 3. संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा ( परीक्षेची वेळ एक तास ) | गुण- 30 |

15. **अर्जासोवत जोडावयाची आवश्यक प्रमाणपत्रे** :-

1. 10 वी व 12 पास असलेली प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
2. प्रवर्ग - अ.जा.,अ.ज., वि.जा. (अ.) , भ.ज.( ब.) , भ.ज. (क), भ.ज.(ड), इ.मा. व., वि.मा.प्र. जातीचे प्रमाणपत्र
3. शाळा सोडल्याचा दाखला
4. अनुभव प्रमाणपत्र
5. पासपोर्ट साईज फोटो - 2 कॉपी
6. संगणक - एम एस सी आय टी प्रमाणपत्र

Scanned with CamScanner

7. टायपिंग मराठी प्रमाणपत्र

8. टायपिंग इंग्रजी प्रमाणपत्र

16. **प्रवेश प्रमाणपत्र :-**

1. परिक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश पोष्टाने सर्वसाधारण पणे 7 दिवस अगोदर उपलब्ध करुन देणेत येतील.
2. परीक्षेच्या उमेदवाराने स्वत:चे प्रवेश आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.
3. परीक्षेच्या दिनांकापूर्वी 3 दिवस अगोदर प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह शिक्षणाधिकारी, ( प्राथ ) कार्यालय जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे संपर्क साधावा.

17. **परीक्षेस प्रवेश :-**

परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान 1 मूळ ओळखपत्र छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

18. डेटा एंन्ट्री ऑपरेटर भरती कर्मचा-यांच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नुसार 100/- रु स्टॅम्पपेपरवर करारनामा करण्यात यावा. तसेच कर्मचा-यांच्या नियुक्ती पत्रामध्ये व त्यांचेशी करण्यात येणा-या करारनाम्यामध्ये मा उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा समावेश करण्यात येईल.

**अटी व शर्ती**

1 . उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती ही 11 महिन्याची राहिल.

2 जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवानियम लागू नाही. अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधीत दावा करण्याचाअधिकार राहणार नाही.

3 अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

4 निवड यादीतील गुणाणुक्रमाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

5 उमेदवारास कंत्राटी कालावधीत सोई नुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

6 भरती प्रक्रिया स्थगित करणे/ रद्द करणे/पदभरती प्रक्रियत बदल करण्याचे सर्व अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही न्यायालयात कोणताही दावा करता येणार नाही.

Scanned with CamScanner

7 सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कंत्राटी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने पद रिक्त झालेस प्रतिक्षाधिन यादीवरील गुणाणुक्रमाचे उमेदवारास नियुक्ती आदेश दिला जाईल. प्रतिक्षाधिन यादी एक वर्षासाठी ग्राहय धरणेत येई

8 नियुक्ती पूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहित नमुन्यात रु. 100/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन घेण्यात येईल आणि त्याचप्रमाणे कर्मचा-यांवर कोणत्याही प्रकाराचा गुन्हा किंवा आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एंन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा व शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती या संदर्भात आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील

9 कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधी नंतर आपोआप संपुष्टात येईल.

10 डेटा एंन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचा-यांस नियमित नियुक्तीसाठी नियुक्तीसाठी कोणतेही हक्क असणार नाहीत.

11 न्यायालयात जाता येणार नाही.

सहि/-

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी प्राथ
जिल्हा परिषद, कोल्हापूर

अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

Scanned with CamScanner

# जिल्हा परिषद, कोल्हापूर शिक्षण विभाग (प्राथमिक)
## शालेय पोषण आहार योजना - डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज - २०२२

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक -------------- दिनांक -------------------

| उमेदवाराचा अलिकडच्या काळातील राजपत्रित अधिकारी यांनी साक्षंकित केलेला पासपोर्ट साईज फोटो |
|---|

प्रति,,
सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर.

**विषय :- शालेय पोषण आहार योजना सन २०२१-२२**
**डेटा एन्ट्री ऑपरेटर पदा करीता अर्ज**

१. उमेदवारांचे नांव :- श्री/श्रीम.-------------------------------------------------------------------
(अडनाव) (स्वत:चे नाव) (वडीलांचे / पतीचे नांव)

२. पत्र व्यवहाराचा पत्ता :- ------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

३. जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) ------------------------------------------------------------

४. वय (दिनांक ३१/१२/२०२१ रोजी) --------------वर्ष----------महिना---------दिवस-------------

५. जात प्रवर्ग - -------------------------- सोबत जात प्रमाणपत्र जोडले आहे / नाही - --------------

६. अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्रं. | परीक्षेचे नाव | परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १० वी | | | | |
| २. | १२ वी | | | | |
| ३. | पदवी परीक्षा | | | | |
| ४. | मराठी टंकलेखन | | | | |
| ५. | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| ६. | एम एस सी आय टी | | | | |

अनुभव

| अ.क्रं. | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी (पासून-पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**अर्जासोबत** सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती

१) -----------------------------------------(२)---------------------------------------------

३) -----------------------------------------(४)---------------------------------------------

डी.डी. चे रक्कम - -------------------- बँकेचे नाव व दिनांक - ----------------------------------

*** प्रतिज्ञापत्र ***

प्रमाणित करता/करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यामुळे माझी निवड रद्द झाल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक :-

ठिकाण :-

**उमेदवाराची स्वाक्षरी**

Scanned with CamScanner

## परिशिष्ट-अ

( शासन निर्णय, शालेय शिक्षण क्रीडा विभाग, क्र. शापोआ २००९/प्र.क्र.९१/प्राशि-४ )
दि.        फेब्रुवारी, २०१० चे परिशिष्ट.

**रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे.**

प्रति,

............................

............................

(येथे नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाव व पत्ता लिहीण्यात यावा.)

ज्या अर्थी (या ठिकाणी नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम लिहिण्यात यावे.) (यापुढे नियुक्ती प्राधिकारी असा उल्लेख केला जाईल.) यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ......................
दिनांक........................नुसार

श्री./श्रीमती/कुमारी..............................................................................

राहणार.................................... (यापुढे उमेदवार म्हणून उल्लेख केला जाईल.) याची नियुक्ती पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर शालेय पोषण आहार योजनेंतर्गत डेटा एन्ट्री ऑपरेटर पदावर कंत्राटी पध्दतीने ......................या कालावधीसाठी प्रति माह रुपये [redacted] 20650/- एवढ्या मानधनावर नियुक्ती केली आहे. (यापुढे संबंधीत नियुक्ती पत्र असा उल्लेख केला जाईल.)

आणि, त्या अर्थी, मी श्री/श्रीमती/कुमारी................................................... लिहून देतो/देते की,

१. मला प्राप्त झालेल्या नियुक्ती पत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या आहेत आणि त्या मला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

२. जर माझ्याकडून एखाद्या अटी व शर्तीचा भंग झाला तर ........................ पदावरील माझी नियुक्ती रद्द केली जाईल याची मला जाणीव आहे.

३. मी या संदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वेच्छेने सदर कंत्राटी नियुक्ती स्वीकारीत आहे.

४. या कंत्राटी नियुक्तीनंतर मला कायम स्वरुपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

तसेच या करारपत्राच्या कालावधीनंतर शासनावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राटी सेवेशी निगडीत कोणत्याही प्रकारची मागणी मी करणार नाही, अशी या करारपत्राद्वारे हमी देत आहे.

५. माझे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास माझी नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. याबद्दल माझी कुठलीही तक्रार राहणार नाही.

श्री./श्रीमती/कुमारी ..................................................

स्वाक्षरी............................

दिनांक.............................

समक्ष-

१)

२)

(नियुक्ती प्राधिकाऱ्याचे पदनाम) यांच्यासाठी आणि यांच्या वतीने

--------------------------------------------------------------------------------

(नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम)

XXXXXXXXX

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner